आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.००वाजता

३ ऑक्टोबर २०२४ - गुरुवार

**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री आंतरवासिता योजनेचा प्रायोगिक तत्वावर प्रारंभ

- मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत सुमारे २ कोटी पात्र महिलांच्या खात्यात तिसऱ्या टप्प्यातली लाभाची रक्कम जमा

- बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरणी अटक केलेल्या संस्थाचालकांना एका गुन्ह्यात जामीन, मात्र दुसऱ्या गुन्ह्यात अटक

- मध्य पूर्व आशियातल्या अस्थिर वातावरणाचा देशातल्या शेअर बाजारांना मोठा फटका /सेन्सेक्स १ हजार ७६९, तर निफ्टी ५४६ अंकांनी गडगडला

**आणि**

- राज्य सरकारचे २०२२-२३ साठीचे शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार जाहीर, बॅडमिंटनपटू प्रदीप गंधे यांना जीवन गौरव पुरस्कार

**<><><><><>**

प्रधानमंत्री आंतरवासिता योजनेला आज प्रायोगिक तत्वावर प्रारंभ करण्यात आला. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी चालू वर्षाच्या अर्थसंकल्पात ही योजना जाहीर केली होती. येत्या ५ वर्षात देशातल्या एक कोटी युवकांना ५००अग्रेसर कंपन्यांमधे आंतरवासिता प्रशिक्षणाची संधी उपलब्ध करुन देणं हे या योजनेचं उद्दिष्ट आहे. योजनेच्या पथदर्शी प्रकल्पासाठी सरकारने ८०० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्यांनी

pminternship.mca.gov.in या पोर्टलवर येत्या १२ ते २५ ऑक्टोबर दरम्यान अर्ज करावे असं सरकारी सूत्रांनी सांगितलं. २१ ते २४ वर्ष वयोगटातल्या आणि पूर्णवेळ नोकरी किंवा पूर्णवेळ शिक्षण न घेणाऱ्यांना योजनेसाठी अर्ज करता येईल. कंपन्यांच्या सामाजिक जबाबदारी निधीतून गेल्या ३ वर्षात झालेल्या खर्चाच्या आधारे कंपन्यांची निवड होणार असून कंपन्यांसाठी योजनेतला सहभाग पूर्णपणे ऐच्छिक राहणार आहे. पात्र लाभार्थ्यांना केंद्रसरकारकडून दरमहा साडेचार हजार रुपये तर नियोक्ता कंपनीकडून दरमहा ५०० रुपये मिळतील. त्याखेरीज या योजनेअंतर्गत नैमित्तिक खर्चापोटी प्रत्येकी सहा हजार रुपयांचं अनुदान कंपनी व्यवहार मंत्रालयाकडून देण्यात येईल.

**<><><><><>**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत राज्यातल्या १ कोटी ९६ लाख ४३ हजार २०७ पात्र महिलांच्या खात्यात तिसऱ्या टप्प्यातली लाभाची रक्कम जमा झाल्याची माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली. आपल्या समाज माध्यमावरच्या संदेशात त्यांनी उर्वरित पात्र महिलांच्या खात्यातही लवकरच रक्कम जमा होईल, असं म्हटलं आहे.

**<><><><><>**

केंद्रीय कौशल्य विकास राज्यमंत्री जयंत चौधरी यांच्या हस्ते आज मुंबईतल्या एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालयात आय. टी. आय मुंबईचा नामकरण सोहळा झाला. आता या संस्थेचे नामकरण भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था असं केलं गेलं आहे. यानिमीत्तानं झालेल्या कार्यक्रमात पुणे, नाशिक, छत्रपती संभाजी नगर, अमरावती आणि नागपूर नागपूर इथल्या संत गाडगेबाबा स्वच्छ भारत प्रबोधिनींचा प्रारंभही केला गेला.

देशातलं एकमेव कौशल्य विद्यापीठ महाराष्ट्रात असून, तिथं कौशल्ययुक्त शिक्षणाच्या माध्यमातून प्रत्यक्ष रोजगार देण्यावर भर दिला जाणं, ही अभिमानाची बाब असल्याचं ते म्हणाले.

राज्याचे कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्यासह अनेक मान्यवर या कार्यक्रमाला उपस्थित होते.

**<><><><><>**

बुलढाणातल्या खामगाव इथल्या महर्षी वेदव्यास प्रतिष्ठान अंतर्गत जय जगदंबा वेद विद्यालयाच्या नव्या वास्तुचं भूमिपूजन आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झालं. यावेळी मुख्यमंत्र्यांनी वेद विद्यालयाच्या नव्या वास्तूचं भूमिपूजन करून कोनशिलेचं अनावरण केलं. त्यानंतर त्यांनी वारकरी संप्रदायाशी संवाद साधला. या कार्यक्रमाला केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव, अयोध्येच्या श्रीराम जन्मभूमीचे कोषाध्यक्ष स्वामी गोविंददेव गिरी, उपस्थित होते.

**<><><><><>**

राज्यात आजपासून सर्वत्र शारदीय नवरात्रौत्सवाला उत्साहाने प्रारंभ झाला. आजपासून पुढचे नऊ दिवस देवीच्या नऊ रुपांचं पूजन केलं जाईल. तुळजापूरची तुळजाभवानी, कोल्हापूरची अंबाबाई, वणीची सप्तशृंगी आणि माहूरची रेणुका या साडेतीन शक्तीपीठांच्या मंदिरांमध्येही नवरात्रोत्सवाला घटस्थापनेने प्रारंभ झाला. याशिवाय राज्यात इतरत्रही देवी मंदिरांमधे उत्सव सुरु झाला. मुंबईतही मुंबादेवी आणि महालक्ष्मी यांच्या मंदिरांमध्ये या उत्सवाला सुरुवात झाली आहे. घरोघरी घटस्थापना करुन भाविक देवीचं पूजन करीत आहेत.

**रत्नागिरी** जिल्ह्यात रत्नदुर्ग किल्ल्यावरची श्री भगवती देवी, आडिवऱ्याची महाकाली, दाभोळची चंडिका देवी, चिपळूणची विंध्यवासिनी अशा पुरातन मंदिरांसह जिल्ह्यातल्या देवीच्या अन्य मंदिरांमध्ये नवरात्रौत्सवानिमित्त विविध कार्यक्रम होत

आहेत. **सिंधुदुर्ग** जिल्ह्यातही आज अनेक मंदिरांमध्ये घटस्थापना झाली. **छत्रपती संभाजीनगरात** कर्णपुरा इथल्या तुळजाभवानी देवीच्या यात्रेला आजपासून सुरुवात झाली. **धुळे** शहरातल्या एकविरा माता मंदिरात देखील नवरात्रोत्सवाला सुरुवात झाली. **नागपुरातही** कोराडी इथल्या श्री महालक्ष्मी जगदंबेच्या मंदिरात नवरात्रौत्सवाला आज मोठ्या आनंदात आणि उत्साहात सुरुवात झाली. नवरात्रौत्सवानिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी समाजमाध्यमांवरच्या संदेशातून देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत.

**-<><><><><>**

नवरात्रीच्या पार्श्वभूमीवर अंबामातेच्या गोंधळ गीताचं अनावरण आज शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे हस्ते मुंबईत झालं. विविध मुद्द्यांवर दसरा मेळाव्यात सविस्तर बोलणार असल्याचं ते म्हणाले.

**<><><><><>**

बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरणी संस्थाचालकांना कल्याणच्या विशेष न्यायालयानं एका गुन्ह्यात जामीन दिला पण दुसऱ्या गुन्ह्यात अटक करण्याचे आदेश दिले. या दुसऱ्या गुन्ह्यासाठी त्यांना उद्या न्यायालयात सादर केलं जाण्याची शक्यता आहे. अध्यक्ष उदय कोतवाल आणि सचिव तुषार आपटे यांना काल कर्जतमधून अटक झाली होती.

या प्रकरणातला आरोपी अक्षय शिंदेच्या चकमकीतल्या मृत्यू प्रकरणाच्या चौकशीला गती देण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयानं आज दिले. या चौकशीचा अहवाल १८ नोव्हेंबरला सादर करायलाही न्यायालयानं सांगितलं. या प्रकरणाची चौकशी दंडाधिकारी करत आहेत.

**<><><><><>**

पुण्यात वानवडीमध्ये एका शाळेच्या बस चालकाने शाळेतील दोन अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचार केल्याचं उघड झालं आहे. मुलींनी या घटनेची माहिती पालकांना दिल्यावर या प्रकरणी वानवडी पोलिस ठाण्यात चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संजय रेड्डी असं आरोपीचं नाव आहे. या प्रकरणाची चौकशी करून संबंधितांवर कारवाई केली जाईल असं पोलीस उपायुक्त आर राजा यांनी सांगितलं.

**<><><><><>**

मध्य पूर्व आशियातल्या अस्थिर वातावरणाचा मोठा फटका आज देशातल्या शेअर बाजारांना बसला. सेन्सेक्स १ हजार ७६९ अंकांनी घसरुन ८२ हजार ४९७ अंकांवर बंद झाला निफ्टी ५४६ अंकांनी कोसळून २५ हजार २५० अंकांवर स्थिरावला. सकाळपासून सुरू झालेली घसरण व्यवहारसंपेपर्यंत वाढतच गेली. यामुळं मुंबई शेअर बाजारातल्या गुंतवणूकदारांची मालमत्ता १० लाख कोटी रुपयांनी कमी झाली. सर्व प्रकारच्या कंपन्यांचे समभागांना या घसरणीचा फटका बसला. फ्युचर आणि ऑप्शन्स व्यवहारांसाठी सेबीनं आणलेल्या नव्या दिशानिर्देशांमुळंही बाजारात घसरण झाली.

**<><><><><>**

राज्य सरकारनं २०२२-२३ या वर्षासाठीचा शिवछत्रपती राज्य क्रीडा जीवन गौरव पुरस्कार बॅडमिंडनपटू आणि प्रशिक्षक प्रदीप गंधे यांना जाहीर केला आहे. उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक आणि जिजामाता पुरस्कार क्रिकेटसाठी दिनेश लाडे, पॅरा शूटींगसाठी सुमा शिरुर, दिव्यांगांच्या ॲक्वेटीक्सकरता राजाराम घाग, धनुर्विद्येसाठी शुभांगी रोकडे, जिम्नॅस्टिकसाठी पवन भोईर आणि कबड्डीसाठी अनिल घाटे यांना जाहीर झाला. खेळाडूंच्या श्रेणीमध्ये ॲथलेटिक्समध्ये अविनाश साबळे, नेमबाजीत रुद्रांश पाटील आणि शाहू माने, नौकायन विष्णू सर्वानन यांच्यासह इतर एकूण ४७

खेळाडूंना हे पुरस्कार जाहीर झाले. साहसी क्रीडा प्रकारात जल क्षेत्रात जयंत दुबळे आणि जमीन क्षेत्रात कस्तुरी सावेकर यांचा या पुरस्कारानं गौरव केला जाईल. दिव्यांग श्रेणीतही ६ महिला आणि २ पुरुषांना हे पुरस्कार मिळणार आहेत. २०१९-२०, २०२०-२१, २०२१-२२ या वर्षांसाठीही काही अतिरीक्त पुरस्कार राज्य सरकारनं आज जाहीर केले.

<><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा रेडिओच्या माध्यमातून जनतेशी संवाद साधण्याच्या मन की बात हा विशेष कार्यक्रम सुरु झाल्याला आज १० वर्ष पूर्ण झाली. प्रधानमंत्र्यांनी २०१४ मध्ये आजच्या दिवशी पहिल्यांदा या कार्यक्रमातून जनतेशी थेट संवाद साधला होता. आजवर या कार्यक्रमाच्या विविध भागात प्रधानमंत्र्यांनी सर्वसामान्य माणसाचं जीवन प्रभावित करणाऱ्या सामाजिक, सांस्कृतिक, पर्यावरण विषयक मुद्द्यांवर चर्चा केली आहे. मन की बात हा कार्यक्रम प्रधानमंत्र्यांशी संवाद साधण्याचं जनतेचं एक महत्वपूर्ण माध्यम बनला आहे.

<><><><>

लोकसभेतले विरोधी पक्ष नेते राहुल गांधी उद्या महाराष्ट्राच्या दौर्यावर येत आहेत. गांधी यांच्या हस्ते उद्या कोल्हापुरातल्या कसबा बावड्यात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पूर्णाकृती पुतळ्याचं अनावरण होणार आहे. दुसर्या दिवशी ते राजर्षी शाहू महाराज यांच्या समाधी स्थळावर अभिवादन करतील. त्यानंतर त्यांच्या उपस्थितीत दुसरं संविधान संमेलन होईल. या संमेलनासाठी विविध सामाजिक संघटनेचे १ हजार २०० निमंत्रित प्रतिनिधी उपस्थित असतील.

<><><><>

आगामी विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसला मिळणाऱ्या एकूण जागांपैकी १० टक्के जागा अल्पसंख्याक समाजातल्या उमेदवारांना देणार असल्याचं

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज जाहीर केलं. त्यांच्या पक्षानं महायुतीकडे ६० जागांची मागणी केल्याची चर्चा आहे.

<><><><>

शारजा इथं आज सुरु झालेल्या महिलांच्या आयसीसी टी-ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत सलामीच्या सामन्यात बांगलादेशानं स्कॉटलंडवर १६ धावांनी विजय मिळवला. भारताचा पहिला सामना उद्या न्यूझीलंडसोबत होणार आहे.

<><><><>

वाशीम जिल्ह्यात मनोरा तालुक्यातल्या बंजारा समाजाची काशी मानल्या जाणाऱ्या पोहरादेवी इथं बंजारा विरासत संग्रहालय उभारलं आहे. येत्या शनिवारी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या संग्रहालयाचं लोकार्पण केलं जाणार आहे.

संग्रहालयाच्या चार मजली इमारतीच्या १३ दालनांमध्ये विविध देखावे आणि चित्रांद्वारे बंजारा समाजाचा इतिहास, त्यांचे उत्सव, समाज जीवन रंगवलं आहे.

<><><><>

धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या अनुषंगाने १० ते १५ ऑक्टोबर दरम्यान दीक्षाभूमीवर येणा-या लाखो बौद्ध अनुयायांच्या सोयीसाठी सर्व आवश्यक सुविधांची तयारी लवकरात लवकर पूर्ण करण्याचे निर्देश मनपा आयुक्त  डॉ. अभिजीत चौधरी यांनी नागपूर महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना दिले. मनपा आयुक्तांनी या संदर्भात आज पालिका मुख्यालयात आढावा बैठक घेतली त्यात त्यांनी हे निर्देश दिले.

<><><><>

हैदराबाद क्रिकेट असोसिएशनशी संबंधित मनी लॉंड्रिंग प्रकरणात ईडीनं आज माजी अध्यक्ष आणि क्रिकेटपटू मोहम्मद अझरुद्दीन याला समन्स बजावलं. अझरुद्दीनवर आपल्या अध्यक्षपदाच्या कार्यकाळात निधीचा गैरवापर केल्याचा

आरोप आहे. या आर्थिक व्यवहारांबाबत चौकशीसाठी हजर राहण्याचे आदेश ईडीनं दिले आहेत.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसात कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

**//<><><><><>//**